पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली
दिनांक ०६/१२/२०१८

# वार्तापत्र

## ग्रामस्थांनी जाळला नक्षल पुतळा

एटापल्ली तालुक्यातील कसनसुर गावातील नागरीकांनी नक्षलविरोधी घोषणा देवुन कसनसुर एलओएस कमांडर महेश गोटा याचा पुतळा जाळुन आपला रोष व्यक्त केला. नक्षलवादामुळे आमच्या तरुण पिढीचे नुकसान झाले आहे. शिक्षणापासुन वंचित राहीले आहे. आता आम्ही नक्षलवाद्यांच्या भुलथांपांना बळी पडणार नाही. आमचा पिएलजीए सप्ताहाला विरोध आहे. आमचा लोकशाहीवर विश्वास आहे. नक्षलवाद मुर्दाबाद, महेश गोटा मुर्दाबाद. अशा घोषणा देत नागरिकांनी पुतळ्याचे दहन केले.

